३)	**संगणकीय अर्ज भरण्यासाठी सूचना :**

१)	**अर्जदाराचे नांव :**

दिलेल्या चौकोनात अर्जदाराने इंग्रजी लिपीत सुरुवातीस आपले आडनाव, त्यानंतर स्वत:चे नाव व शेवटी वडिलांचे/ आईचे / पतीचे नाव लिहावे. त्याखाली दिलेल्या चौकोनात वर सांगितलेल्या क्रमाने इंग्रजी कॅपिटल (Block Letters) मध्ये नाव लिहावे. (इ. १० वी व इ. १२ वी च्या प्रमाणपत्रावरील नावाऐवजी अन्य नाव नमूद केल्यास त्यासंबंधीचा कायदेशीर पुरावा अर्ज स्वीकृतीचे वेळी सोबत ठेवणे आवश्यक आहे.)

**टिप :** आडनाव नसेल तर डॅश (-) चिन्ह टाईप करावे.

२)	**जन्मतारीख:**

अर्जदाराने जन्मतारखेची नोंद करताना दिनांक, महिना व वर्ष ड्रॉपडाउन लिस्टमधून निवडावे.

| दिनांक | | महिना | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 0 | 1 | June | 1 | 9 | 8 | 5 |

याप्रमाणे होईल. प्रत्येक बाबीसाठी संबंधित माहिती दिसेल त्यामधून योग्य ती माहिती निवडण्यात यावी. इ. १० वीच्या शालान्त परीक्षा प्रमाणपत्रावरील जन्मतारीख नोंदवावी.

३)	महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय ? होय किंवा नाही यापैकी योग्य पर्यायाच्या वर्तुळावर क्लिक करा.

३.१)	आधार कार्ड आहे काय ? होय/ नाही पैकी योग्य पर्याय निवडावा.

४)	**कायमचा पत्ता :**

दिलेल्या चौकोनात अचूक माहिती भरावी.

५)	**संपर्क माहिती :**

मोबाईल क्रमांक व ई-मेल आय डी अचूकपणे नोंदवावा.

६)	**लिंग :**

अर्जदार पुरुष परीक्षार्थी असल्यास त्यावर क्लिक करावे किंवा अर्जदार स्त्री परीक्षार्थी असल्यास त्यावर क्लिक करावे.

७)	**जातीचा प्रवर्ग :**

अर्जदाराचा प्रवर्ग नोंदविताना त्या मुद्यासमोर आलेल्यांपैकी सर्व प्रवर्गांच्या पर्यायापैकी आपणांस लागू असणारा प्रवर्ग निवडून त्यावर क्लिक करावे.

८) **अपंगत्वाची माहिती :**

शासन निर्णय क्र. अपंग /१००२/(१५४/०२) असंक दिनांक २३/८/२००५ नुसार अपंग असल्यास त्याप्रमाणे होय किंवा नसल्यास नाही म्हणून नोंदविणेस त्यापैकी एकावर क्लिक करावे. तसेच लेखनिक हवा आहे काय ? या प्रश्नासमोरील होय किंवा नाही यापैकी एकावर क्लिक करावे.

९) **कोणत्या वर्गासाठी शिक्षक पात्रता परीक्षा द्यावयाची आहे ? :**

अ) **परीक्षा स्तरासाठी पुढीलप्रमाणे तीन पर्याय दिले आहेत.**

१) पेपर I- इ.१ ली ते इ.५ वी,

२) पेपर II - इ. ६ वी ते इ. ८ वी

३) दोन्ही पेपर I व पेपर II

उपरोक्त तीन पर्यायापैकी एक पर्याय निवडून त्यावर क्लिक करावे.

१०) **भाषा विषय :**

परीक्षेकरीता मराठी / इंग्रजी /उर्दू भाषा विषय पहिला राहील. यापैकी एकाची निवड करावी. त्याची अचूक निवड आवेदनपत्रात करावी.

- मराठी माध्यमासाठी दुसरा भाषा विषय इंग्रजी राहील
- इंग्रजी माध्यमासाठी दुसरा भाषा विषय मराठी राहील
- उर्दू माध्यमासाठी दुसरा भाषा विषय मराठी किंवा इंग्रजी राहील . त्याचीही अचूक निवड आवेदनपत्रात भरावी.

११) उर्वरित विषयही आराखडयाप्रमाणे परीक्षेस राहतील याची नोंद घ्यावी. पेपर २ साठी ऐच्छिक विषय म्हणून सामाजिक अभ्यास किंवा गणित व विज्ञान यापैकी एक विषय निश्चित करून परीक्षेच्या वेळी उत्तरपत्रिकेवर विहित ठिकाणी त्याची नोंद करणे आवश्यक आहे. आवेदनपत्रात ऐच्छिक विषय नोंदविण्याची आवश्यक्ता नाही.

पेपर I व पेपर II साठी उर्वरित विषयही राहतील. विषय, अभ्यासक्रम आराखडा व निर्धारित गुण याबाबतच्या सूचना संकेतस्थळावर आहेत.

१२) **परीक्षेचे माध्यम : परीक्षा ही मराठी, इंग्रजी व उर्दू या तीन माध्यमातून होईल.**

- भाषा विषय पहिला मराठी निवडणाऱ्या परीक्षार्थीसाठी मराठी माध्यमच राहील. भाषा विषय पहिला इंग्रजी निवडणाऱ्या परीक्षार्थीसाठी इंग्रजी माध्यमच राहील व भाषा विषय पहिला उर्दू निवडणाऱ्या परीक्षार्थीसाठी उर्दू माध्यम परीक्षेसाठी राहील याची नोंद घ्यावी.

- भाषा विषयांव्यतिरिक्त उर्वरित विषयाची परीक्षा मराठी, इंग्रजी व उर्दू या माध्यमातूनच घेण्यात येईल याची परीक्षार्थींनी नोंद घ्यावी.

१३) **शैक्षणिक अर्हता :**
याबाबत ऑनलाईन आवेदनपत्रात दिलेल्या पर्यायापैकी आपणांस लागू असणारा योग्य पर्याय निवडावा व त्यावर क्लिक करावे.

१४) **व्यावसायिक अर्हता:**
शिक्षण शास्त्र पदविका व शिक्षण शास्त्र पदवी याबाबत ऑनलाईन आवेदनपत्रात दिलेल्या पर्यायापैकी आपणांस लागू असणारा योग्य पर्याय निवडावा व त्यावर क्लिक करावे.

१५) **परीक्षा केंद्र :**

परीक्षा केंद्रासाठी महाराष्ट्र राज्यातील एका जिल्हयाची निवड करावी. यासाठी आवश्यक सर्व सूचना वाचूनच परीक्षा केंद्रांच्या जिल्हयाची निवड करावी.

१६) **ओळखपत्र :**
निवडणूक मतदार छायाचित्र ओळखपत्र/ आधार कार्ड/ वाहन चालक लायसन्स/ पासपोर्ट / पॅन कार्ड/ राष्ट्रीयकृत बँक पासबुक यापैकी कोणत्याही ओळखपत्रावरील क्रमांकाचा उल्लेख संगणकावर ऑनलाईन आवेदनपत्रात नोंदवावा.

१७) **Security :**

स्क्रीनवर दिसणारा Security code नमूद करावा.

- **प्रतिज्ञा पत्र :**

प्रतिज्ञापत्र वाचून भरलेला अर्ज/आवेदनपत्र save करुन त्याची खात्री करुन घेऊन पुढील मुद्याकडे जावे.

१८) **चलन प्रिंट घेणे :**
**ऑनलाईन चलनाबाबत पुढील सूचना आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

- आपला ऑनलाईन अर्ज भरुन झाल्यानंतरच आपणांस चलनाची प्रिंट मिळेल.
- सदर चलनाच्या आधारे विहित शुल्क नजीकच्या State Bank of India च्या / State Bank of Hyderabad च्या शाखेत बँकेच्या वेळेत जमा करुन मिळणाऱ्या चलनाच्या दोन प्रती आपल्या ताब्यात घ्या.

१९) **फोटो, स्वाक्षरी व चलन अपलोड करणे :**
पुढील टप्प्यावर फोटो, स्वाक्षरी आणि शुल्क भरलेल्या चलनाची प्रत अपलोड करावयाची आहे. यासाठी निर्धारित ठेवलेल्या जागी नवीनतम (लेटेस्ट) फोटो व स्वाक्षरी स्कॅन करुन upload करावी. या टप्प्यासाठी

अर्जदाराचा सध्याचा फोटो पांढऱ्या पार्श्वभूमीवर काढावा आणि तो फोटो व स्वाक्षरी यांची स्वतंत्र इमेज उपलब्ध असणे आवश्यक आहे.

I) ३.५ सें.मी x ४.५ सें.मी., आकाराचा रंगीत फोटो स्कॅन करावा. स्कॅन इमेज फोटोच्या बॉर्डरपर्यंत क्रॉप करण्यात यावी. सदर इमेज ५ के.बी. ते ५० के. बी. या आकारात बसेल याची खात्री करुन घ्यावी. इमेज जेपीजी फाईलमध्ये असणे आवश्यक आहे.

II) एका पांढऱ्या कोऱ्या कागदावर ४.५ सें.मी x २ सें.मी. चा चौकोन काढा. त्यामध्ये काळ्या शाईच्या पेनने स्पष्ट स्वाक्षरी करावी. सदरची स्वाक्षरी असलेला चौकोन स्कॅन करावा. स्वाक्षरी असलेली चौकोनाच्या बॉर्डरपर्यंत क्रॉप करावी. स्वाक्षरीची इमेज २ के.बी. ते ५० के.बी. या आकाराची असेल, याची खात्री करा. स्वाक्षरीची इमेज जेपीजी फाईलमध्ये असणे आवश्यक आहे.

III) चलन अपलोड करणे - SBI / SBH मध्ये शुल्क भरलेल्या चलनाची प्रत स्कॅन करावी. या स्कॅन प्रतीची (इमेजची) साईज १५० के.बी. पेक्षा कमी असावी. विहित जागी चलनाची प्रत ऑनलाईन अपलोड करावी. (चलनाची इमेज जेपीजी फाईलमध्ये असणे आवश्यक आहे.)

IV) तुमच्या संगणकावर फोटो, स्वाक्षरी व चलन झाल्यानंतर अर्जामध्ये दिसेल.

V) चलनावरील Transaction Id, बँक Branch Code Number आणि विहित शुल्क रक्कम ही माहिती आपला Login Id व Password वापरून आवेदनपत्रात भरा.

VI) चलन अपडेट निर्धारित कालावधीतच पूर्ण करावे. कालावधी संपल्यानंतर चलन अपडेट न झाल्यामुळे परीक्षार्थीस परीक्षेस प्रविष्ठ होता येणार नाही. चलन अपडेट करण्यासाठी पुरेसा कालावधी देण्यात आलेला आहे. विहित कालावधीनंतर आवेदनपत्रासाठीचे चलनाचा Transaction Id भरता येणार नाही. म्हणजेच आवेदनपत्राची Hard Copy सादर करता येणार नाही, याचीही नोंद घ्यावी.

**टिप : संगणकीय अर्जात तारांकित [* (स्टार) ] असलेल्या बाबीची माहिती भरणे अनिवार्य आहे, याची नोंद सर्व परीक्षार्थींनी घ्यावी.**